# प्रेस नोट

दिनांक २८/०२/१९

## रायतेगाव, ता. कल्याण परीसरात ०२,०३,०००/- रु किंमतीचा अवैद्य देशी दारुचा साठा जप्त, स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण यांची कामगीरी

-----------------ooo------------------

मा. पोलीस अधीक्षक सो डॉ. श्री. शिवाजीराव राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सो श्री. संजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. श्री. व्यंकट आंधळे यांचे आदेशान्वये दिनांक २७/०२/२०१९ रोजी रात्रौ २२.३५ वा. चे सुमारास सपोनि श्री. अविनाश पाटील यांचे सोबत पो.हवा./२२३६ डी.के.कडव, पो.हवा./२२६७ बी.जी.महाले, पो.हवा./१८१९ एस.आर.मुंढे, पो.हवा./१२३७ एस.व्ही कदम, सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा असे कल्याण तालुका पोलीस ठाणेचे हददीत कल्याण मुरबाड रोडवर प्रोव्हिशन गुन्हयाचे अनुषंगाने खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना अनिकेत केशव रोडके रा.सरळगाव ता.मुरबाड हा अल्टो मारुती कार नं. एमएच ०५, एजे ४०४२ हिचेतुन म्हारळ ते सरळगाव अशी विना परवाना देशी दारुची वाहतुक करीत असतो अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने कल्याण मुरबाड रोडवर रायते गावचे हददीत रॉयल पाम हॉटेल समोर नाकाबंदी करण्यासाठी थांबुन वाहनांची तपासणी करीत असताना अल्टो मारुती कार नं. एमएच ०५, एजे ४०४२ हि मुरबाड बाजुकडे संशयास्पद जाताना दिसुन आली तसे तिचे चालक अनिकेत केशव रोडके रा.सरळगाव ता.मुरबाड याचे सह कारची झडती घेता त्याचे ताब्यात कारमध्ये ७८,०००/- रु.किं.चे संत्रा देशी दारुचे एकुण ३० बॉक्स व १,२५,०००/- रु.किं.ची अल्टो कार असा एकुन ०२,०३,०००/- रु किंमतीचा माल जप्त करण्यात आला. सदरचा माल हा त्याने रोज वाईन्सचे मालक धरमपाल पुर्ण नाव पत्ता माहित नाही व रोज वाईन्य मधील माल देणारा नोकर नाव पत्ता माहित नाही यांचेकडुन आणला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द कल्याण तालुका पोस्टे येथे गुन्हा रजी नंबर ııı ९६/२०१९ मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई ) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चालु आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक सो डॉ. श्री. शिवाजी राठोड, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो श्री. संजयकुमार पाटील, वपोनि श्री. व्यंकट आंधळे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. अविनाश पाटील , पो.हवा./२२३६ डी.के.कडव, पो.हवा./२२६७ बी.जी.महाले, पो.हवा./१८१९ एस.आर.मुंढे, पो.हवा./१२३७ एस.व्ही कदम, नेम. स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण यांनी केली आहे.